# निशाणी १८ वरील आदेश

१. सदरील अर्ज प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवुन विनाकैफीयतीचा आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन कि, प्रतिवादी हे मुंबई येथे नोकरी निमीत्त रहावयास आहेत. त्यामुळे त्यांना रजा न मिळाल्यामुळे मुदतीत कैफियत / म्हणणे देता आले नाही. सदरचा दावा स्थावर मिळकती संबंधीचा असल्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देणे अत्यंत जरुरीचे झाले आहे. प्रतिवादी यांची कैफियत स्वीकारली नाही तर प्रतिवादी यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामूळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला ६७ दिवसांचा उशीर माफ करण्यात येवून विनाकैफियत चौकशीचा आदेश रद्द करण्यात यावा व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणने देऊन अर्जास विरोध्द केला आहे. वादी यांचे म्हणणे असे आहे की, अर्ज कायदेशीर नसून खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी यांनी मुंबई येथे राहत असल्याबाबत अथवा रजा न मिळाल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व दाव्यातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता. वादीने प्रस्तुतचा दावा खरेदीखत बेकायदेशीर असल्याचा जाहीर ठराव, खरेदी पत्र उलटवून नोंदवून देण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ ते ४ हे दाव्याच्या कामी हजर होऊनही मुदतीत कैफियत दिली नाही म्हणून त्यांच्या विरुध्द दिनांक ०३/०४/२०१९ रोजी विनाकैफियत चौकशीचे आदेश परित करण्यात आलेले आहेत. प्रतिवादी यांनी दिलेले कारण व त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या उशिराचा विचार करता ते संयुक्तीक वाटत नाही. प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकती संबंधी आहे. तसेच, वादीने खरेदीखत उलटून व परत नोंदवून मागितले आहे.

त्यामुळे प्रतिवादी यांचा मौल्यवान हक्क हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेला आहे. प्रस्तुतचा दावा निशाणी ५ वर युक्तीवाद कामी नेमलेला आहे. त्यामुळे नैसर्गीक न्याय तत्तवानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यास वादी यांचे नुकसान होणार नाही. परंतु, प्रतिवादी यांनी कैफियत/म्हणणे दाखल करण्यास केलेल्या उशीरासाठी खर्चाचे आदेश पारित करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं. १ ते ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला ६७ दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी नं. १ ते ४ यांच्या विरुध्दचा विनाकैफियत चौकशीचा आदेश निष्काषीत करण्यात येवून त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

४. प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रुपये २००/– खर्च म्हणून अदा केल्यास त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

Sd/–

दि.१५/०७/२०१९ ( **ए.एच.शेख** )

३रे सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सांगोला

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | B.B.Salvade |
| (b) | Court | : | Shri. A.H. Shaikh<br>3rd Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 15.07.2019 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 16.07.2019 |